असा. क्र. ४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, जानेवारी १२, २००४/ पौष २२, शके १९२५**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.**–मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. ३२-३४

दिनांक ७ जानेवारी २००४ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर '' **महाराष्ट्र शासन राजपत्रात** '' दिनांक १२ जानेवारी २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९२३ चा मुंबई १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौपन्नाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई करमणूक शुल्क (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमून देईल त्या तारखेस अंमलात येईल.

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ (यात यापुढे ज्याचा निर्देश '' मुख्य अधिनियम '' असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ च्या खंड (ब) मध्ये,— १९२३ चा मुंबई १.

(क) दुसऱ्या परंतुकातील, '' दोन रुपयांहून '' या मजकुराऐवजी, '' साधारण व वातशीतल चित्रपटगृहाच्या बाबतीत तीन रुपयांहून आणि वातानुकूलित चित्रपटगृहांच्या बाबतीत चार रुपयांहून '' हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) चौथ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

'' परंतु तसेच, फिरत्या चित्रपटगृहाच्या मालकाने सेवा आकार म्हणून प्रत्येक तिकिटामागे पन्नास पैशाहून अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम, स्वतंत्रपणे आकारलेली असेल आणि अशा फिरत्या चित्रपटगृहाचा मालक, अशा सेवा आकाराची रक्कम मुंबई चित्रपटगृहे (विनियमन) अधिनियम, १९५३ व महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही अन्य कायदा यांच्या तरतुदींअन्वये आवश्यक असलेल्या सुविधा व सुरक्षिततेच्या उपाययोजनांव्यतिरिक्त (याबाबतीत काढण्यात आलेल्या **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे) राज्य शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, फिरत्या चित्रपटगृहाची देखभाल व सुविधा व सुरक्षिततेच्या उपाययोजना पुरविण्याकरिता परवाना कालावधीमध्ये खर्च केली असल्याची (या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे), विहित अधिकाऱ्याची खात्री पटेल अशा प्रकारे दाखवून देईल तर, अशा फिरत्या चित्रपटगृहाचा मालक, त्याने सेवा आकारापोटी गोळा केलेली व खर्च केलेली रक्कम, त्याने, अशा फिरत्या चित्रपटगृहाच्या देखभालीकरिता व त्यासाठी अतिरिक्त विनिर्दिष्ट सुविधा पुरविण्याकरिता व सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याकरिता परवाना कालावधीत खर्च केलेली रक्कम असल्यासंबंधीचे लेखापरीक्षित लेखे परवाना संपुष्टात आल्यापासून एका महिन्याच्या कालावधीमध्ये विहित अधिकाऱ्याकडे सादर करील, या शर्तीस अधीन राहून, सेवा आकारापोटी दिलेल्या अशा रकमेचा, प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेमध्ये समावेश केला जाणार नाही.''.

१९५३ चा मुंबई ११.

३. मुख्य अधिनियमाचे कलम ३, पोट-कलम (१) याच्या खंड (क) मधील, विद्यमान तक्त्याऐवजी पुढील तक्ता दाखल करण्यात येईल :— सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

" **तक्ता**

| अनुक्रमांक (१) | क्षेत्र (२) | मालकाने निश्चित केलेल्या प्रवेश आकारावरील करमणूक शुल्काचा दर (३) |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील . . | ४५ टक्के. |
| २ | इतर सर्व महानगरपालिका आणि कटक क्षेत्रांच्या हद्दीतील | ४० टक्के. |
| ३ | ' अ ' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील . . | ३४ टक्के. |
| ४ | ' ब ' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील . . | २८ टक्के. |
| ५ | ' क ' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील . . | २२ टक्के. |
| ६ | उपरोक्त नोंदी १ ते ५ मध्ये समाविष्ट नसलेली कोणतीही इतर क्षेत्रे. | १५ टक्के. ". |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जानेवारी १२, २००४/पौष २२, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Entertainments Duty (Second Amendment) Act, 2003 (Mah. Act No. IV of 2004), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRATIMA UMARJI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. IV of 2004.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 12th January 2004).*

An Act further to amend the Bombay Entertainments Duty Act, 1923.

Bom. I of 1923. WHEREAS it is expedient further to amend the Bombay Entertainments Duty Act, 1923, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-fourth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Bombay Entertainments Duty (Second Amendment) Act, 2003.

(*2*) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette,* appoint.

Amendment of section 2 of Bom. I of 1923.

**2.** In section 2 of the Bombay Entertainments Duty Act, 1923, (hereinafter referred to as " the principal Act "), in clause (*b*),— Bom. I of 1923.

(*a*) in the second proviso, for the words " two rupees " the word " three rupees in case of ordinary and air-cooled cinemas and four rupees in case of air-conditioned cinemas " shall be substituted ;

(*b*) after the fourth proviso, the following proviso shall be added, namely :—

" Provided also that, any *payment* not exceeding fifty paise per ticket if charged by the proprietor of a touring cinema towards service charges, separately and the proprietor of such touring cinema shows to the satisfaction of the prescribed officer (as defined in the rules made under this Act), that such payment made is spent by him during the license period towards maintenance and providing facilities and safety measures in such touring cinema, as specified by the State Government (by notification in the *Official Gazette* issued in this behalf), in addition to those required under the provisions of the Bombay Cinemas (Regulation) Act, 1953 and the Maharashtra Cinemas (Regulation) Rules, 1966, or any other law for the time being in force, in that case, such payment towards service charges shall not be included in the payment for admission, subject to the condition that the proprietor of such touring cinema shall submit, to the prescribed officer within a period of one month from the date of expiry of license period, the audited accounts of the service charges collected and spent by him towards the maintenance and for providing the additional specified facilities and safety measures for such touring cinema.". Bom. XI of 1953.

**3.** In section 3 of the principal Act, in sub-section (*1*), in clause (*c*), for the existing table, following table shall be substituted, namely :— Amendment of section 3 of Bom. I of 1923.

" TABLE

| Serial No. | Area | Rate of entertainment duty on payment for admission fixed by the proprietor |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Within the limits of Brihan-Mumbai Municipal Corporation. | 45 per cent |
| 2 | Within the limits of all other Municipal Corporations and Cantonments. | 40 per cent |
| 3 | Within the limits of 'A' Class Municipal Councils. | 34 per cent |
| 4 | Within the limits of 'B' Class Municipal Councils. | 28 per cent |
| 5 | Within the limits of 'C' Class Municipal Councils. | 22 per cent |
| 6 | Any other areas not covered by entries (1) to (5) above. | 15 per cent.". |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई